# <u>जाहिरात</u>

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यातील प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) यांच्या अखत्यारितील १६ उपनगरीय रुग्णालयाच्या आस्थापनेवरील पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र), पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (बालरोग चिकित्सा शास्त्र), पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (अस्थिव्यंग चिकित्सा शास्त्र), पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (वैद्यक शास्त्र), पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (शल्यक्रिया शास्त्र), पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण शास्त्र) या संवर्गातील रू. १५६००-३९१०० अधिक रु.६०००/- या वेतनश्रेणीत खालील तक्त्यात नमूद केलेली पदे तदर्थ तत्वावर अर्हतांना राज्य शासनाच्या मंजुरीसापेक्ष एकावेळी सहा महिन्यांपेक्षा जास्त नाही अशा कालावधीसाठी भरण्यासाठी निवडयादी तयार करावयाची असल्याने खालीलप्रमाणे नमुद केलेली अर्हता धारण करणाऱ्या व अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत.

| | |
|---|---|
| **<u>अर्ज प्राप्त होण्याचे ठिकाण</u>** | **के.बी.भाभा मनपा सर्वसाधारण रुग्णालय, बांद्रा (प.), ७ वा मजला, डॉ.आर.के. पाटकर मार्ग, मुंबई ४०००५०,** |
| **<u>अर्ज विक्री व स्विकृती चा कालावधी</u>** | **दि.१७.०१.२०२० ते दि.३१.०१.२०२० (सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते संध्याकाळी ४.३० वाजेपर्यंत)**<br>**दि. ३१.०१.२०२० नंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही** |

**<u>पदाचे नाव / वर्ग:-</u>**

**<u>१. पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र) (वर्ग-अ) एकूण रिक्त जागा- २० .</u>**

**Full Time Post Graduate Medical Officer (Obstetrcies and Gynecology )**

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एस.ई.बी.सी. | ई.डब्ल्यू.एस. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | ३ | ३ | २ | २ | १३ |
| महिला ३०% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | १ | ७ |
| एकूण | २ | २ | १ | ० | ० | ० | ० | ५ | ४ | ३ | ३ | २० |

| | |
|---|---|
| नि:समर्थ असलेल्या व्यक्ती ४ % | सदर संवर्गात नि:समर्थ असलेल्या व्यक्ती करीता १ पद आरक्षित असून सदर पद दिव्यांग प्रकारच्या पदनिश्चितीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर भरण्यात येईल. तदपर्यंत सदर १ पद खुल्या प्रवर्गातून रिक्त ठेवण्यात येईल |

## शैक्षणिक अर्हता

१) उमेदवार वैधानिक विद्यापीठाची औषध शास्त्र व शरीर चिकित्सा शास्त्र या विषयातील पदवी (एम.बी.बी.एस.) आणि संविधिक विद्यापीठाची प्रसुतिशास्त्र आणि स्त्रीरोग यातील पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य अर्हता असली पाहिजे. (**MD / MS/ DNB** )

२) कर्मचारी महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलशी नोंदणीकृत असावा.

३) पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर सुस्थापित रुग्णालयातील / चिकित्सालयातील या विनिर्दिष्ट विषयांतर्गत कामाचा १ वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव असावा. बृहन्मुंबई महानगपालिका सेवेतील कर्मचा-यांकरिता ०१ वर्ष अनुभवाची अट शिथील करण्यात येईल.

४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदर असणा-या कर्मचा-यांना प्राधान्य देण्यात येईल.
५) बंधपत्र ज्यांना लागू असेल त्या उमेदवारांनी बंधपत्र पूर्ण केल्याचे (**Bond Completion Certificate UG & PG**) (संबंधित वैदयकिय महाविदयालयाच्या अधिष्ठाता कार्यालयाने दिलेले) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

## २. पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (बालरोग चिकित्सा शास्त्र) (वर्ग-अ) एकूण रिक्त जागा- २९ .

**Full Time Post Graduate Medical Officer (Pediatrics)**

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एस.ई. बी.सी. | ई.डब्ल्यू. एस. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | २ | १ | १ | १ | १ | १ | ५ | ३ | ३ | ३ | २२ |
| महिला ३०% | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | २ | १ | १ | ७ |
| एकूण | १ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ७ | ५ | ४ | ४ | २९ |

| | |
|---|---|
| नि:समर्थ असलेल्या व्यक्ती ४ % | सदर संवर्गात नि:समर्थ असलेल्या व्यक्ती करीता १ पद आरक्षित असून सदर पद दिव्यांग प्रकारच्या पदनिश्चितीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर भरण्यात येईल. तदपर्यंत सदर १ पद खुल्या प्रवर्गातून रिक्त ठेवण्यात येईल |

### शैक्षणिक अर्हता

१) उमेदवार वैधानिक विद्यापीठाची औषध शास्त्र व शरीर चिकित्सा शास्त्र या विषयातील पदवी (एम.बी.बी.एस.) आणि संविधिक विद्यापीठाची बालरोग चिकित्सा शास्त्र यातील पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य अर्हता असली पाहिजे. (**MD / MS/ DNB** )
२) कर्मचारी महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलशी नोंदणीकृत असावा.
३) पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर सुस्थापित रुग्णालयातील / चिकित्सालयातील या विनिर्दिष्ट विषयांतर्गत कामाचा १ वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव असावा. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेतील कर्मचा-यांकरिता ०१ वर्ष अनुभवाची अट शिथील करण्यात येईल.
४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदर असणा-या कर्मचा-यांना प्राधान्य देण्यात येईल.
५) बंधपत्र ज्यांना लागू असेल त्या उमेदवारांनी बंधपत्र पूर्ण केल्याचे (**Bond Completion Certificate UG & PG**) (संबंधित वैदयकिय महाविदयालयाच्या अधिष्ठाता कार्यालयाने दिलेले) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

## ३. पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (अस्थिव्यंग चिकित्सा शास्त्र) (वर्ग-अ) एकूण रिक्त जागा- १५ .

**Full Time Post Graduate Medical Officer (Orthopedics)**

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एस.ई. बी.सी. | ई.डब्ल्यू. एस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | १० |
| महिला ३०% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ५ |
| एकूण | २ | १ | १ | १ | ० | ० | ० | ३ | २ | २ | ३ | १५ |

| | |
|---|---|
| नि:समर्थ असलेल्या व्यक्ती ४ % | सदर संवर्गात नि:समर्थ असलेल्या व्यक्ती करीता १ पद आरक्षित असून सदर पद दिव्यांग प्रकारच्या पदनिश्चितीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर भरण्यात येईल. तदपर्यंत सदर १ पद खुल्या प्रवर्गातून रिक्त ठेवण्यात येईल |

## शैक्षणिक अर्हता

| |
|---|
| १) उमेदवार वैधानिक विद्यापीठाची औषध शास्त्र व शरीर चिकित्सा शास्त्र या विषयातील पदवी (एम.बी.बी.एस.) आणि संविधिक विद्यापीठाची अस्थिव्यंग चिकित्सा शास्त्र यातील पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य अर्हता असली पाहिजे. (**MD / MS/ DNB** )<br>२) कर्मचारी महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलशी नोंदणीकृत असावा.<br>३) पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर सुस्थापित रुग्णालयातील / चिकित्सालयातील या विनिर्दिष्ट विषयांतर्गत कामाचा १ वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव असावा. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेतील कर्मचा-यांकरिता ०१ वर्ष अनुभवाची अट शिथील करण्यात येईल. |
| ४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदर असणा-या कर्मचा-यांना प्राधान्य देण्यात येईल.<br>५) बंधपत्र ज्यांना लागू असेल त्या उमेदवारांनी बंधपत्र पूर्ण केल्याचे (**Bond Completion Certificate UG & PG**) (संबंधित वैदयकिय महाविदयालयाच्या अधिष्ठाता कार्यालयाने दिलेले) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. |

## ४. पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (वैद्यकशास्त्र) (वर्ग-अ) एकूण रिक्त जागा- ४९ .

**Full Time Post Graduate Medical Officer (General Medicine)**

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एस.ई. बी.सी. | ई.डब्ल्यू. एस. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ४ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ६ | ५ | ३ | ७ | ३३ |
| महिला ३०% | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | ३ | २ | २ | ३ | १४ |
| खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| एकूण | ६ | ४ | १ | १ | २ | १ | १ | १० | ७ | ५ | ११ | ४९ |

| | |
|---|---|
| नि:समर्थ असलेल्या व्यक्ती **4** % | सदर संवर्गात नि:समर्थ असलेल्या व्यक्ती करीता २ पदे आरक्षित असून सदर पदे दिव्यांग प्रकारच्या पदनिश्चितीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर भरण्यात येईल. तदपर्यंत सदर २ पदे खुल्या प्रवर्गातून रिक्त ठेवण्यात येईल |

## शैक्षणिक अर्हता

| |
|---|
| १) उमेदवार वैधानिक विद्यापीठाची औषध शास्त्र व शरीर चिकित्सा शास्त्र या विषयातील पदवी (एम.बी.बी.एस.) आणि संविधिक विद्यापीठाची वैद्यकशास्त्र यातील पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य अर्हता असली पाहिजे. (**MD / MS/ DNB** )<br>२) कर्मचारी महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलशी नोंदणीकृत असावा.<br>३) पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर सुस्थापित रुग्णालयातील / चिकित्सालयातील या विनिर्दिष्ट विषयांतर्गत कामाचा १ वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव असावा. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेतील कर्मचा-यांकरिता ०१ वर्ष अनुभवाची अट शिथील करण्यात येईल. |
| ४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदर असणा-या कर्मचा-यांना प्राधान्य देण्यात येईल.<br>५) बंधपत्र ज्यांना लागू असेल त्या उमेदवारांनी बंधपत्र पूर्ण केल्याचे (**Bond Completion Certificate UG & PG**) (संबंधित वैदयकिय महाविदयालयाच्या अधिष्ठाता कार्यालयाने दिलेले) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. |

## ५. पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (शल्यक्रिया शास्त्र) (वर्ग-अ) एकूण रिक्त जागा- २६

**Full Time Post Graduate Medical Officer (General Surgery)**

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एस.ई.बी .सी. | ई.डब्ल्यू. एस. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | २ | १ | १ | १ | १ | ० | १ | ३ | ३ | २ | ३ | १८ |
| महिला ३०% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ८ |
| एकूण | ३ | २ | १ | १ | १ | ० | १ | ५ | ४ | ३ | ५ | २६ |

| | |
|---|---|
| नि:समर्थ असलेल्या व्यक्ती ४ % | सदर संवर्गात नि:समर्थ असलेल्या व्यक्ती करीता १ पद आरक्षित असून सदर पद दिव्यांग प्रकारच्या पदनिश्चितीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर भरण्यात येईल. तदपर्यंत सदर १ पद खुल्या प्रवर्गातून रिक्त ठेवण्यात येईल |

### शैक्षणिक अर्हता

१) उमेदवार वैधानिक विद्यापीठाची औषध शास्त्र व शरीर चिकित्सा शास्त्र या विषयातील पदवी (एम.बी.बी.एस.) आणि संविधिक विद्यापीठाची शल्य क्रिया शास्त्र यातील पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य अर्हता असली पाहिजे. (**MD / MS/ DNB** )

२) कर्मचारी महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलशी नोंदणीकृत असावा.

३) पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर सुस्थापित रुग्णालयातील / चिकित्सालयातील या विनिर्दिष्ट विषयांतर्गत कामाचा १ वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव असावा. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेतील कर्मचा-यांकरिता ०१ वर्ष अनुभवाची अट शिथील करण्यात येईल.

४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदर असणा-या कर्मचा-यांना प्राधान्य देण्यात येईल.

५) बंधपत्र ज्यांना लागू असेल त्या उमेदवारांनी बंधपत्र पूर्ण केल्याचे (**Bond Completion Certificate UG & PG**) (संबंधित वैदयकिय महाविदयालयाच्या अधिष्ठाता कार्यालयाने दिलेले) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

## ६. पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण शास्त्र) (वर्ग-अ) एकूण रिक्त जागा- ८९ .

**Full Time Post Graduate Medical Officer (Anesthesiology)**

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एस.ई.बी.सी. | ईडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ८ | ५ | २ | १ | २ | १ | १ | १३ | ८ | ६ | ८ | ५५ |
| महिला ३०% | ४ | २ | १ | १ | १ | १ | १ | ५ | ४ | ३ | ५ | २८ |
| खेळाडू ५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ५ |
| अनाथ आरक्षण१ % | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकूण | १३ | ७ | ३ | २ | ३ | २ | २ | १९ | १३ | १० | १५ | ८९ |

| | |
|---|---|
| नि:समर्थ असलेल्या व्यक्ती ४ % | सदर संवर्गात नि:समर्थ असलेल्या व्यक्ती करीता ४ पदे आरक्षित असून सदर पद दिव्यांग प्रकारच्या पदनिश्चितीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर भरण्यात येईल. तदपर्यंत सदर ४ पदे खुल्या प्रवर्गातून रिक्त ठेवण्यात येईल |

## शैक्षणिक अर्हता

| |
|---|
| १) उमेदवार वैधानिक विद्यापीठाची औषध शास्त्र व शरीर चिकित्सा शास्त्र या विषयातील पदवी (एम.बी.बी.एस.) आणि संविधिक विद्यापीठाची बधिरीकरण शास्त्र यातील पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य अर्हता असली पाहिजे. (**MD / DNB**) (बधिरीकरणशास्त्र विभागात पदव्युत्तर पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदव्युत्तर पदविका धारक (DA) विचारात घेतले जातील. )<br>२) कर्मचारी महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलशी नोंदणीकृत असावा.<br>३) पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर सुस्थापित रुग्णालयातील / चिकित्सालयातील या विनिर्दिष्ट विषयांतर्गत कामाचा १ वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव असावा व पदव्युत्तर पदविका प्राप्त केल्यानंतर ०२ वर्षाचा अनुभव असावा. बृहन्मुंबई महानगपालिका सेवेतील कर्मचा-यांकरिता ०१ वर्ष / ०२ वर्ष अनुभवाची अट शिथील करण्यात येईल. |
| ४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदर असणा-या कर्मचा-यांना प्राधान्य देण्यात येईल.<br>५) बंधपत्र ज्यांना लागू असेल त्या उमेदवारांनी बंधपत्र पूर्ण केल्याचे (**Bond Completion Certificate UG & PG**) (संबंधित वैदयकिय महाविदयालयाच्या अधिष्ठाता कार्यालयाने दिलेले) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. |

**उपरोक्त सर्व विभागांच्या पदांसाठी संगणक ज्ञान व मराठी भाषा विषयक अर्हता खालील प्रमाणे आहेत.**

| |
|---|
| ६) उमेदवार १०० गुणांचा मराठी विषय घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा उत्तीर्ण असावा. तथापि, त्याप्रमाणे नसल्यास त्याने मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा नियुक्तीपासून २ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सदर परिक्षा उत्तीर्ण होईपर्यंत उमेदवाराचीं नियुक्तीतात्पुरत्या स्वरुपाची असेल तसेच त्यांना वार्षिक वेतन वाढ देण्यांत येणार नाही. परंतु दोन वर्षात मराठी भाषेची सदर परिक्षा उत्तीर्ण झाल्यास वार्षिक वेतनवाढ पूर्वलक्षी प्रभावाने लागू होईल. मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |
| ७) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर, स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम. एस.सी. आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी /वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा. तथापी, उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने / तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी. ची परिक्षा नेमणुकीच्या दिनांकापासून ०२ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल. |

**पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी पदाचे निवडीचे निकष:-**

सर्वदृष्टीने परिपूर्ण कागदपत्रे सादर केलेल्या अर्हताप्राप्त उमेदवारांनी, त्यांच्या पदव्युत्तर पदवी / पदविका परिक्षेच्या अंतिम वर्षात प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडयादी तयार करण्यात येईल. परदेशातील विद्यापीठातून एमबीबीएस आणि पदव्युत्तर पदवी/ पदवी / पदविका प्राप्त केलेल्या उमेदवारांचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

1. एमडी., एम.एस., अर्हता धारक व डी.एन.बी. अर्हताधारक यांना समकक्ष समजण्यात येईल. एम.डी., एम.एस. यांना प्राप्त ६० टक्के वरील गुणांकाना डी.एन.बी. ए-ग्रेड, समकक्ष समजून यामध्ये परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी लागणा-या प्रयत्नांवरुन (वजा करुन) गुणवत्ता यादी बनविण्यात येईल. तदनंतरही समान गुण येत असतील तर जन्म तारखेवरुन म्हणजे, ज्यांचे वय अधिक असेल त्या उमेदवाराला प्राथमिकता देण्यात येईल.

2. अंतिम पदव्युत्तर पदवी/पदविका (MS/MD/DNB/DA) परीक्षा एका पेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास प्रत्येक अतिरिक्त प्रयत्नांसाठी २ गुण वजा केले जातील,
3. सामाजिक व समांतर आरक्षणानुसार सामाईक गुणवत्ता यादीतील उमेदवारांच्या विषयनिहाय अंतिम निवडयादया तयार करण्यात येतील.

दोन किंवा अधिक उमेदवारांचे गुण समान झाल्यास उमेदवारांच्या प्राधान्य क्रमाकरिता खाली दिलेले निकष क्रमवारीनुसार विचारात घेण्यात येतील.

अ) अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास धारण केलेली उच्च शैक्षणिक अर्हता,
ब) उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक,
क)उमेदवारांच्या प्राधान्य क्रमाकरीता त्यांचे प्रथम पदव्युत्तर पदवी (MD/MS) व नंतर पदविका (DNB/DA) परिक्षेत प्राप्त गुण विचारात घेण्यात येतील,
ड)वरील निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास, वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल,

उपरोक्त निकषांनुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना राहतील.

**<u>पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी या पदांकरिता वयोमर्यादा व निवडीची कार्यपध्दतीः-</u>**

**<u>वयोमर्यादाः-</u>**

- खुल्या प्रवर्गातील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांचे वय दि.०१.०८.२०१९ रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये. मागासप्रवर्गाच्या आरक्षित पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ४३ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये.
- अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेमध्ये असल्यास उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा नाही.
- शारिरीकदृष्टया अपंग असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.
- माजी सैनिकांना सेवेमध्ये वयोमर्यादा सवलत शासन निदेशानुसार प्रकरण परत्वे लागू करण्यात येईल.

**निवडीची कार्यपध्दतीः-**

१. सर्व प्रवर्गातील उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची खुल्या प्रवर्गाचे उमेदवार म्हणून निवड करण्यात येईल. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गामध्ये भरतीकरिता अर्ज सादर करण्याची मुभा राहील.
२. खुल्या प्रवर्गाच्या पदासाठी निवड झालेली असेल अशा उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गाच्या उमेदवारांची खुल्या पदावर नेमणुक करण्यात येईल.
३. अर्ज सादर केलेल्या पात्र उमेदवारांना मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीचा दिनांक व वेळ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. उमेदवारांनी सर्व मुळ प्रमाणपत्रांसह / इतर कागदपत्रांसह पडताळणीकरीता व मुलाखतीकरीता स्वःखर्चाने उपस्थित रहावे.

उपरोक्त पदांच्या अर्हता व सर्व अटींची पुर्तता करणाऱ्या पात्र ठरलेल्या उमेदवारांची गुणवत्तेनुसार तसेच रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार व मागासवर्गीयांच्या आरक्षणानुसार निवडयादी प्रसृत करण्यात येईल. निवडयादी एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल, त्या दिनांकापर्यंत या दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राहय ठरेल, त्यानंतर ही निवडयादी व्यपगत होईल.

## <u>अर्जाचे शुल्क</u>

**खुल्या प्रवर्गातील उमेदवार :** रु. ५७१.४३ +(२.५% CGST (रु.१४.२८)) + २.५% SGST (रु.१४.२८)) = **एकूण रु. ६००/-**

**मागास/इतर मागासप्रवर्गातील उमेदवार :** रु. २८५.७१ + (२.५% CGST (रु.७.१४) + २.५% SGST (रु.७.१४)) = **एकूण रु.३००/-**

**इतर महत्वाच्या सुचना:**

1. भरती प्रक्रीयेअंतर्गत उद्भवणाऱ्या सर्व बाबींसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल व तो उमेदवारांना बंधनकारक असेल यासंबंधात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यव्हार किंवा व्यक्तिगत विचारणांना उत्तर दिले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
2. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशु व पारदर्शक पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.
3. शासनाने विविध शासन निर्णयानुसार वेळोवेळी निर्गमित केलेल्या विविध सवलती, अटी, शर्ती सदर भरती प्रकियेसाठी लागू राहतील व त्याचे पालन करण्यात येईल.
4. निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.
5. उमेदवाराने सदर पदाच्या अर्हता/अटींनुसार तो सदर पदासाठी पात्र असल्याची खात्री करणे आवश्यक आहे
6. इतर कोणत्याही पद्धतीने उदाहरणार्थ पोस्टाने/कुरिअरने पाठविलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत.
7. उमेदवाराने प्रवेश पत्रावर स्वत:चे अलिकडे काढलेले रंगीत छायाचित्र चिकटविणे आणि कागदपत्रे / प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या वेळेस ते सादर करणे आवश्यक आहे.
8. उमेदवारांना मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
9. उमेदवाराने पडताळणीच्यावेळी सर्व आवश्यक मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर न केल्यास त्यांना अपात्र ठरविण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. पडताळणीच्या वेळी मूळ प्रमाणपत्रांसहित सर्व प्रमाणपत्रांच्या / कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचा एक साक्षांकित संच सोबत असणे आवश्यक आहे.

**<u>सर्वसाधारण अटी:-</u>**

1. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. तथापि निवडयादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
2. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या आणि अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.
3. अगोदरच बृहन्मुंबई महापालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचा-याला वर नमूद केलेल्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल तर त्याने / तिने त्याच्या / तिच्या खातेप्रमुखांचे 'नाहरकत प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे.
4. उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार

विचारात घेतला जाणार नाही.

5. पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.
6. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.
7. उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला / अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे (एमबीबीएस परिक्षेची गुणपत्रिका व प्रमाणपत्रे, पद्व्युत्तर परिक्षेची गुणपत्रिका व प्रमाणपत्रे, डी.एन.बी., डी.ए. पदविका परिक्षेची गुणपत्रिका व प्रमाणपत्रे इ.) / व्यावसायिक अर्हता/ संबंधित गुणपत्रिका / सक्षम अधिका-यांनी दिलेले जाती प्रमाणपत्र / जाती वैधतेचे प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र यांच्या छायांकित साक्षांकित प्रती वैयक्तिक माहितीपत्रासोबत (Bio-Data) जोडणे आवश्यक आहे. विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहपूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात. अंतिम वर्षाची एम.बी.बी.एस. पदवी परीक्षा/ पदव्यूत्तर पदवी / पदविका एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र (Attempt Certificate) सादर करणे आवश्यक आहे.
8. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो / ती भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.
9. निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही उपनगरीय रुग्णालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही उपनगरीय रुग्णालयात बदली योग्य असेल.
10. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबादल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
11. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे सेवानिवासस्थान उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही.
12. सदर नियुक्ती तदर्थ तत्वावर असल्याने निवड झालेल्या बाहय (मुंबई महापालिकेच्या सेवेत नसलेले) उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम १९९९ लागू होणार नाहीत. मात्र अगोदरच मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या उमेदवारास मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम १९९९ लागू राहातील.
13. सन २००८ नंतर मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या उमेदवारास निवड झाल्यानंतर पूर्वीप्रमाणेच सदर पदावरील नियुक्तीनंतर नविन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल. परंतु बाहय (मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत नसलेल्या) उमेदवारास नविन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होणार नाहीत.
14. अगोदरच महापालिकेच्या सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांना १७९ दिवसांनंतर १ दिवसाचा **तांत्रिक खंड** देण्यात येईल तर बाहय उमेदवारांना १७९ दिवसानंतर एक दिवसाचा **सेवाखंड** देण्यात येईल.
15. विजा (अ), भज (ब), भज(क), भज (ड) या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रगर्वातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.
16. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य प्रवर्गातील उमेदवार तसेच महिला आरक्षाणांतर्गत अर्ज करणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी ते उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

17. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक क्र.बीसीसी/२०११/प्र.क्र./१०६४/११/१६ब दि.१२.१२.२०११ नुसार मागावर्गीयांच्या आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने त्याचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. जात वैधता नसल्यास निवड झाल्यानंतर सर्व कागदपत्रे पडताळणीसाठी संबंधित पडताळणी समितीकडे सादर करुन त्याची पोचपावती सादर करणे आवश्यक आहे. पोचपावती सादर न केल्यास तसेच त्यानी सादर केलेले जात प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीने अवैध ठरविल्याचे कळविण्यात आल्यास त्याक्षणी त्यांना कोणतीही सूचना न देता / त्यांच्या विरुध्द कोणतीही खात्यांतर्गत चौकशी न करता त्यांचे नियुक्तीचे आदेश त्वरित रद्द करण्यात येतील.

18. निवड झालेल्या उमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

19. उमेदवारांना भरतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

20. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर करावे.

21. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार माननीय महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

22. समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निदेशानुसार सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित छायाप्रती आणणे आवश्यक आहे.

**23.** खेळाडुंनी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. राक्रीधो-२००२/प्रक ६८/क्रीयुसे/२ दि.१/०७/२०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्र.राक्रीधो-२००२/ ६८/क्रीयुसे/२ दि.१८.०८.२०१६ आणि त्यानंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणांसंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल, तसेच खेळाडू उमेदवारांनी सुधारित तरतुदीनुसार विभागीय उप-संचालक यांच्याकडून खेळाच्या माणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. सुधारीत निर्णयानूसार गट-अ साठी क्रिडा विषयक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र विभागीय उप-संचालक क्रिडा व युवक सेवा, पूणे यांनी दिलेल्या पडताळणी प्रमाणपत्राची प्रत सादर करावी. सदर प्रत सादर केल्याशिवाय खेळाडूच्या अर्जाचा खेळाडू संवर्गातून विचार होणार नाही.

**गट-अ साठी पात्र क्रीडा स्पर्धा**

1. **अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा** :-
   - I) ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा
   - II) एशियन्स गेम्स
   - III) जागतिक क्रीडा स्पर्धा
   - IV) एशियन चॅम्पियनशीप
   - V) कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप
   - VI) युथ ऑलिम्पिक
   - VII) ग्रॅन्ड मास्टर (बुध्दिबळ)

2. **पॅरॉलिम्पिंक आंतरराष्ट्रीय स्पर्धा:-**
   I. पॅरॉलिम्पिक गेम्स
   II. पॅरा एशियन गेम्स
   III. वर्ल्ड पॅरॉलिम्पिक गेम्स

3. **जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा :-**
   जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा बोर्डाने आयोजित केलेले खेळ
4. **आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा :**
   आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजित केलेले खेळ
5. **ग्रॅन्ड मास्टर किताब**

(टिप -उपरोक्त नमुद अ.क्र. 1,3 व 4 या क्रीडा स्पर्धाना ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन्स गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धाचा समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच 5% आरक्षणासाठी पात्र राहतील)

24. सामाजिक व शैक्षणिक मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णय क्र.बीसीसी/२०१८/प्र.क्र.५८१ ए/२०१८/१६-ब दि.०५.१२.२०१८ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक बीसीसी/२०१८/प्र.क्र.५८१ ए/२०१८/१६-ब दि.०४.०७.२०१९ अन्वये एसईबीसी आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांकडे सद्य:स्थितीत जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राशिवाय सध्या अर्ज करता येईल. तथापि सदर उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीच्या वेळी जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
25. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांकरीता शासन निर्णय क्र.राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२.०२.२०१९ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र /कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
26. महिलांचे आरक्षण, महिला व बालकल्याण विभागाच्या शासन निर्णय क्र. ८२/२००१/मएसा/२०००/ प्र.क्र.४१५/का-२, दि.२५.०५.२००१ मधील तरतूदीनुसार राहिल.
27. उपनगरीय रुग्णालयांतील जास्त कार्यभार असलेली रुग्णालयातील म्हणजेच ( पूर्व उपनगरातील -राजावाडी रुग्णालय, घाटकोपर, पं. मदनमोहन मालवीय शताब्दी रुग्णालय गोवंडी, खा.ब. भाभा रुग्णालय कुर्ला, श्रीमती म.तु. अगरवाल रुग्णालय, मुलुंड (प). पश्चिम, उपनगरातील- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मनपा रुग्णालय, कांदिवली (प), खु.बे. भाभा रुग्णालय, वांद्रे (प), सिध्दार्थ रुग्णालय, गोरेगांव वि.न.देसाई रुग्णालय, सांताक्रूझ (पूर्व) येथील सदर संवर्गाची पदे प्राध्यान्याने भरण्यात येतील व तदनंतर इतर रुग्णालयातील पदे भरण्यात येतील.

**<u>विशेष सूचना:-</u>**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसया संस्थेला अर्ज लिहीणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
2. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
3. मध्यस्थ/ठग/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याचे आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सुचना देण्यात येत आहेत
4. प्रशासकीय किंवा अन्य काराणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यांवर थांबविण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
5. सेवायोजन कार्यालये/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
6. सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे. उमेदवाराने वेबसाइट उघडण्यासाठी Internet Explorer 6 अथवा त्या वरील आवृत्तीचाच वापर करावा.

**सही/-**
**प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख**
**(माध्यमिक आरोग्य सेवा.)**